साप्ताहिक
आकाशतरंग

# जे.एम. पटेल कॉलेज भंडारा, येथे सायबर सुरक्षा जागरूकता कार्यशाळा संपन्न

आकाश तरंग

भंडारा - क्विक हील फाऊंडेशन , पुणे आणि सायबर सेल महाराष्ट्र पोलिस भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार,१८ ऑगस्ट २०२३ रोजी जे.एम.पटेल महाविद्यालय,भंडारा येथे सायबर सुरक्षा जागरूकता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेचे आयोजन संगणकशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता कक्ष जे.एम.पटेल यांनी केले .जे.एम.पटेल कॉलेज, भंडारा यांनी क्विक हील फाऊंडेशन,पुणे सोबत सायबर सुरक्षेच्या प्रचारासाठी सामंजस्य करार केलेला आहे QuickHeal Technologies हि अँटीव्हायरस क्षेत्रात काम करणारी भारतातील सर्वात मोठी कंपनी असून सायबर सुरक्षेबाबत समाजात जागरुकता आणण्याचे काम QuickHeal Foundation सातत्याने करीत आहे .क्विक हील फाऊंडेशनच्या सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा या मिशनचा एक भाग म्हणून ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती . कार्यक्रमादरम्यान भंडारा पोलिसचे एसडीपीओ डॉ.अशोक बागुल यांचे प्रमुख भाषण झाले.समाजात " सिंघम " म्हणून प्रसिद्ध असलेले डॉ.बागुल यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांना सायबर विश्वात कसे वागावे याबाबत मार्गदर्शन केले.



त्यांनी त्यांच्या पोलीस कारकिर्दीचा वास्तविक जीवनातील अनुभव शेअर केला आणि सायबर पोलीस कसे काम करतात तसेच सायबर गुन्ह्यांचा तपास कसा केल्या जातो याबाबत विस्तृत माहिती दिली.डॉ. बागुल यांनी विविध प्रकारच्या सायबर गुन्हयांबाबत माहिती दिली आणि या सायबर गुन्ह्यांपासून स्वतःला कसे सुरक्षित ठेवता येईल याबद्दल मार्गदर्शन कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे व जे.एम. पटेल महाविद्यालय भंडाराचे प्राचार्य डॉ .विकास ढोमणे यांनी विद्यार्थ्यांना आजच्या डिजिटल युगात सायबर सुरक्षेचे महत्व याविषयी मार्गदर्शन केले . विद्यार्थ्यांनी इंटरनेट , मोबाइल आणि इतर उपकरणांचा नैतिकतेने आणि विवेकबुद्धीने कसा वापर करावा याविषयीच्या विविध तथ्यांवरही त्यांनी प्रकाश टाकला त्यांनी विद्यार्थ्यांनी इंटरनेटचा हुशारीने वापर करावा आणि आपले जीवन सुरक्षित करण्यासाठी सर्व नियमांचे पालन करावे असे आवाहन केले .

प्रास्ताविकात क्विक हील फाऊंडेशन च्या मुख्य कार्यकारी CSR च्या सौ सुगंधा दाणी यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व आणि तरुण विद्यार्थी आणि सामान्य लोकांमध्ये सायबर जागरूकता पसरवून विद्यार्थी कसा फरक निर्माण करू शकतात याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.सौ सुगंधा दाणी यांनी क्विक हील फाऊंडेशनच्या " सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा मिशनचे अनावरण केले.या उपक्रमांतर्गत क्विक हील फाऊंडेशन सायबर स्वयंसेवक ची एक टीम तयार करेल आणि हे सायबर स्वयंसेवक या प्रदेशातील शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत प्रशिक्षण देतील आणि या कार्यासाठी QuickHeal Foundation विद्यार्थ्यांना विद्यावेतन देणार आहे.सौ दाणी यांनी सांगितले की, गेल्या वर्षी जे.एम.पटेल कॉलेजच्या सायबर वॉरियर्स यांनी 10000 पेक्षा जास्त शालेय विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा जागरुकता पसरवली होती.या उल्लेखनीय कार्यासाठी QuickHeal फाउंडेशनने जे.एम. पटेल कॉलेजला विशेष पुरस्काराने सन्मानित केले क्विक हील फाऊंडेशन ( QHF ) च्या " सायबर सुरक्षासाठी सायबर शिक्षा या उपक्रमांतर्गत पुढच्या पिढीला सायबर सुरक्षेविषयी प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट आहे.जर शालेय विद्यार्थी एकदा प्रशिक्षित झाले की,संपूर्ण समाजात जागरुकता आणण्यासाठी ही एक महत्त्वपूर्ण गोष्ट ठरू शकते श्री.राहुल देशपांडे पोलीस इन्स्पेक्टर , सायबर सेल ,भंडारा यांनी विद्यार्थ्यांना सायबर विश्वात सुरक्षित कसे राहायचे याबाबत मार्गदर्शन केले.त्यांनी सायबर फसवणूक ,सेक्सटोरशन आणि अनेक सायबर गुन्हांची उदाहरणे दिली होती वैद्यकीय क्षेत्रातही सायबर गुन्हे कसे घडतात याची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली कोणत्याही सायबर गुन्ह्याबद्दल आपण गोल्डन अवर मध्ये सावध होऊन आपली तक्रार कशी नोंदवावी याची माहिती दिली.24 तासांच्या आत तक्रार केल्यास सायबर गुन्हयांमुळे होणारे नुकसान कमी होण्यास मदत होऊ शकते असे यांनी सांगितले.संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.प्रवीण घोसेकर यांनी पाहूनचे आभार मानले . क्विकहील फाऊंडेशनचे विदर्भ समन्वयक श्री नागेश तलारी श्री . धनंजय जाचक तसेच सायबर सेल , भंडारा चे श्री दिनेंद्र आंबेदरे आणि श्री . गौतम राऊत हे या कार्यशाळेत प्रामुख्याने उपस्थित होते . या कार्यशाळेच्या आयोजनासाठी डॉ . कार्तिक पणिकर , डीन प्रशासन आणि समन्वयक IQAC यांनी खूप मोलाचे सहकार्य केले . कार्यशाळेत डॉ . श्रीधर शर्मा , डॉ . सबाह नसीम , सौ . प्रियांका शर्मा , श्री पलाश फेंडुवार , डॉ . विनी ढोमणे , डॉ . श्याम डफरे हे आवर्जून उपस्थित होते . कार्यशाळेस कु . लावन्या माने , विद्यार्थी समन्वयक QHF व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.